<u>कार्यकारी अभियंता संवर्गात तात्पुरत्या व</u>
<u>स्थानापन्न स्वरुपात पदोन्नत्या/नेमणूका/बदल्या</u>

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१५/ 847 /प्र.७**
**दिनांक :- - 3 MAR 2015**

**संदर्भ - आदेश क्र. प्राधि./पदोन्नती/२०१४/४०७९/प्र.७ दि. ०३.०९.२०१४**

## <u>आ दे श</u>

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन, संदर्भिय आदेशान्वये कार्यकारी अभियंता संवर्गातील अनु. जमाती या प्रवर्गातील रिक्त पद भरणेकरीता अनुभवाची अर्हता कमी करून ११ महिन्याकरीता तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेले **श्री. डी. एन. सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता, डी-२ विभाग / मुं.इ.दु. व पु. मंडळ** यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून कार्यकारी अभियंता या संवर्गात रु.१५६००-३९१०० या वेतन बँडमधील ग्रेड पे रु.६६००/- या वेतन संरचनेत एतदर्थ, <u>पूर्णपणे तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून</u>, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना **कार्यकारी अभियंता,डी-२ विभाग / मुं.इ.दु. व पु. मंडळ** या पदी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे. त्याचबरोबर त्यांचे संदर्भिय आदेशान्वये देण्यात आलेली पदोन्नती संपुष्टात येईल.

२/- सदरहू, अधिकाऱ्याची तात्पुरत्या एतदर्थ (Adhoc) पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेली नेमणूक अभियांत्रिकी सेवा संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमाच्या अधीन राहून ज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या एतदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

३/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

४/- संबधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

ICT Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: ५२६
Date: ४/३/१५

सदर आदेशाची प्रत श्री. बोरेले, सिनिअर प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता.
आवश्यक
४/३

५/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [ वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

६/- संबधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

७/- सदरहू पदोन्नती म्हाडा कर्मचारी संघ यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.७९२४/२०१३ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यांत येत आहेत.

८/- हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

९/- उक्त आदेशानुसार पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत प्राधिकरणाच्या क्र. एमएच/एपीटी/११९१/२४९६/प्र.७ दिनांक ७/१०/१९९४ च्या परिपत्रकातील तरतूदींनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व त्यांना पदोन्नतीसाठी ३ वर्षे अपात्र ठरविण्यांत येईल.

मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.
यांचे मान्यतेने.

३/३/१५
( दिलीप भा. हळदे )
सचिव / प्राधिकरण

प्रति,
श्री. डी. एन. सुर्यवंशी, अनु. उन्नती
कार्यकारी अभियंता, डी-२ विभाग
मुं.इ.दु. व पु. मंडळ
(मुख्य अधिकारी / मुं.इ.दु. व पु. मंडळ यांचे मार्फत )